**CNR No. MHLC01-000152-2016**

**निशाणी क. ओ–**

प्राप्त दिनांक :–13/01/2016
नोंदणी दिनांक :–13/01/2016
निकाल दिनांक :–11/12/2019
कालावधी :–वर्ष महिने दिवस
03 11 11

**न्यायाधीश, 7 वे कामगार न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात**
**पिठासीन अधिकारी श्री. पी. एस. कुलकर्णी,**
**अर्ज (औद्योगीक विवाद अधिनियम) क. 08/2016**

श्री. मालुजंकर सुरेश भानुपती
बी–14, ॲक्वा फार्मा हॉसींग कॉलनी,
रा. 16 ते 19, नानगालवाडी, पोस्ट–नांदगाव,
समर्थ रामदास शाळेजवळ,
महाड, तालुका, जि.महाड. ... अर्जदार

आणि

मे. अर्च फार्मालॅब्स लि.
रजिस्टर ऑफीस–
एच विंग, 4था माळा, टेक्स सेंन्टर,
ऑफ साकी विहार रोड,
चांदीवली, अंन्धेरी पूर्व,
मुंबई– 400 072. ... गैरअर्जदार.

औद्योगिक कलह कायदा 1947, कलम 33–क (2) अन्वये थकीत रक्कमेबाबत अर्ज.

उपस्थिती:– अर्जदारासाठी : श्रीमती.गिता राऊत, विधिज्ञ
गैरअर्जदारासाठी : श्री. सुधीर उपाध्याय, विधिज्ञ.

LABOUR COURT

## निकालपत्र

(दिनांक 11/12/2019)

1. नमूद अर्ज औद्योगिक कलह अधिनियम 1947 मधील कलम 33–क (2) अन्वये अर्जदाराने गैरअर्जदार यांच्याकडे कथितरित्या थकीत असलेली रक्कम मिळण्या करीता सादर केला आहे.

2. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तो गैरअर्जदार कंपनीमध्ये **वैज्ञानिक–तंत्रज्ञ** या पदावर कार्यरत होता. **दि.04.04.2013** रोजी त्यांने सदर नोकरीचा राजीनामा दिलेला आहे. परंतु अर्जदारास त्याचे पदावरून सेवामुक्त करतेवेळेस गैरअर्जदार यांनी त्याचा थकीत पगार, बोनस, रजेचा पगार आणि वाहतुक भत्ता इत्यादी प्रतिपूर्ती पोटी मिळणारे आर्थिक हीतलाभ त्यास अदा केले नाहीत. सदर रक्कमेची त्यांने गैरअर्जदार यांच्याकडे रितसर मागणी केली. परंतु त्यास कुठलाही प्रतिसाद गैरअर्जदार व्यवस्थापनाने दिला नाही. सबब, अर्जदार यांने नमुद रक्कमेची एकत्रितरित्या गिनती करून सदर रक्कम उपरोक्त अर्जाव्दारे व्याजासह मागणी केली आहे. जी की, एकुण **रू.1,72,181**/–इतकी असून सदर रक्कमेवर अर्जदाराने 18 टक्के व्याजाची देखील मागणी केलेली आहे.

3. याउलट गैरअर्जदार यांनी प्रकरणामध्ये हजर होवून **नि.क..सी–3** वरती आपले लेखी म्हणणे दाखल केले असून, अर्जदाराची मागणी पूर्णपणे फेटाळली आहे. गैरअर्जदार यांच्या अतिरिक्त महणण्यानुसार मागील काही वर्षापासून कंपनी ही पूर्णपणे आर्थिक दिवाळखोरीत निघालेली आहे. तसेच कंपनीने काढलेले कर्ज रोखे वेळोवेळी न भरता आल्यामुळे आज रोजी कंपनी पूर्णपणे बंद करण्यात आली असून कामगाराची कायदेशीर देय देणी अदा करण्याबाबत कार्यवाही सुरू असल्याबाबत कंपनीचे म्हणणे आहे. त्यासोबतच गैरअर्जदार यांनी नमुद अर्जाच्या वैधतेबाबत आक्षेप नोंदविला असून अर्ज पूर्णपणे नामंजुर करण्याबाबत विनंती केली आहे.

LABOUR COURT

4. उभय पक्षकारांच्या विरोधाभासी कथनावरुन सदर प्रकरणात **नि.कं.ओ–4** वरती मुद्दे कायम करण्यात आले असून निकालपत्राच्या सोयीकरिता सदरहु मुद्दयांचे मराठीत भाषांतर करण्यात आले.

| अनु क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | अर्जदाराकडे नमुद रक्कम मागणीचा हक्क अस्तित्वात आहे काय ? | 'अंशतः होकारार्थी' |
| 2 | अर्जदार हा गैरअर्जदार यांच्याकडून रक्कम रू. 1,72,181/–मिळण्यास पात्र व हक्कदार आहे काय ? | 'अंशतः होकारार्थी' |
| 3 | व्याज रक्कमेची मागणी औ.क.का.कलम 33–क 2 अन्वये कायदेशीर आहे काय ? | नकारार्थी |
| 4 | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**कारणमीमांसा**

5. अर्जदारातर्फे विधिज्ञ श्रीमती गिता राउत यांनी आपला युक्तीवाद सादर केला. तसेच, गैरअर्जदार यांचेतर्फे विधिज्ञ श्री.सुधीर उपाध्याय यांनी आपला युक्तीवाद पूर्ण केला. प्रकरणात दाखल करण्यात आलेले संपूर्ण कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले. अर्जदाराने आपला तोंडी पुरावा **नि.क.यु–4** वरती सादर केला. तसेच **नि.क.यु.5 आणि 6** वरती दाखल करण्यात आलेल्या कागदपत्राचा आधार घेतला. प्रकरणात उपस्थित झालेले वादातीत मुद्दे हे एकमेकांशी संबंधित व परस्पर अवलंबित असल्यामुळे ते एकत्रितरित्या निष्कर्षीत करण्यात आले आहेत.

LABOUR COURT

**<u>मुददा क. 1 ते 4 :–</u>**

6. अर्जदार कामगाराच्या कथनाप्रमाणे दि. **04/04/2013** रोजी त्यांने आपल्या पदाचा राजीनामा दिलेला आहे. अर्जदारास त्याचे पदावरून सेवामुक्त करतेवेळेस गैरअर्जदार यांनी त्याचा थकीत पगार, बोनस, रजेचा पगार आणि वाहतुक भत्ता प्रतिपूर्ती पोटी मिळणारे आर्थिक हीतलाभ त्यास अदा केला नाही. सदर रक्कमेची त्यांने गैरअर्जदार यांच्याकडे रितसर मागणी केली, परंतु त्यास कुठलाही प्रतिसाद गैरअर्जदार व्यवस्थापनाने दिला नाही. सबब, अर्जदार यांने नमुद रक्कमेची एकत्रितरित्या गिनती करून सदर रक्कम उपरोक्त अर्जाव्दारे व्याजासह मागणी केली आहे.

7. तद्अनुषंगाने, गैरअर्जदार यांनी अर्जदाराची मागणी पूर्णपणे फेटाळली असून गैरअर्जदार असे कथन करतात की, मागील काही वर्षापासून कंपनी ही पूर्णपणे आर्थिक दिवाळखोरीत निघालेली असून कंपनीने काढलेले कर्ज रोखे वेळोवेळी न भरता आल्यामुळे आज रोजी कंपनी पूर्णपणे बंद करण्यात आली असून कामगाराची देय देणी अदा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही प्रशासकीय पातळीवर सुरू असल्याबाबत कंपनीचे म्हणणे आहे.

8. उभय पक्षकारांच्या परस्पर विनंती कथनावरून त्यांना त्यांचे म्हणणे तोंडी व कागदोपत्री पुराव्यानिशी सिध्द करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. तद्अनुषंघाने अर्जदार यांनी **नि.कं.यु–4** वरती आपला तोंडी पुरावा दाखल केला. सदर प्रकरण अंतिम युक्तीवादा करीता नेमले असताना गैरअर्जदार यांनी कामगारांस त्याच्या थकीत रक्कम मागणीच्या अनुषंगाने एकत्रितरित्या **रू.63,951**/–इतकी रक्कम देण्याची तयारी दर्शविली. तसेच, व्यवस्थापनाने ज्या अटी व शर्तीस अधीन राहून एकत्रितरित्या थकीत रक्कम अदा करण्याबाबत तयारी दर्शविली, त्या अटी व शर्तीस अर्जदाराने प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येते.

9. अर्जदाराने व्यवस्थापनाकडून देऊ करण्यात आलेल्या रक्कमेस मान्यता देवून उभयपक्षकरांनमधील वाद संपुष्टात आणल्याचे स्पष्ट केले. त्यासंबंधीच्या संयुक्तिक अटी व शर्ती उभयतानी **नि.कं.युसी–1** सोबत दाखल केल्या. तसेच, सदर रक्कम स्वीकृतीनंतर कामगाराचा नमुद थकीत देण्याबाबत कुठलाही हक्क अबाधित राहणार नाही, या बाबींवरून देखील उभयतामध्ये सहमती घडल्याचे दिसून येते.

10. वरल सर्व बाबींचा विचार करीता सकृत दर्शनी हे स्पष्ट होते की, कामगाराने सादर केलेल्या मागणीअनुषंगाने व्यवस्थापनाने नमूद रक्कम अदाईबाबत कार्यवाही केल्याचे दिसून येते. सबब, कामगाराने सादर केलेल्या थकीत देण्याच्या अर्जामध्ये अंशतः तथ्य असल्याचे आढळून आले. तसेच, उभय पक्षकारानी थकीत देयकाबाबतचा वाद एकत्रित रक्कम अदा करून मिटविण्याचा प्रयत्न केल्यामुळे उपरोक्त परिस्थितीमध्ये कामगारांस त्याच्या मागणीअनुषंगाने थकीत रक्कम व्याजासह अदा करण्याबाबतचे निर्देश पारीत करणे योग्य व न्यायोच्चित ठरणार नाही. सबब, अर्जदार हा त्याने स्वीकृत केलेल्या एकत्रित रक्कमेस पात्र व हक्कदार आहे, असे जाहिर करण्यात येते. करिता, नमूद अर्ज हा **नि.कं.युसी–1** वरील अटी व शर्तीप्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे.

11. सबब, वरील चर्चेस अनुसरून मी मुद्दा कं. 1 ते 4 चे निष्कर्ष वरीलप्रमाणे दिलेले असून सदर निष्कर्षाअन्वये दाखल अर्ज प्रकरणात पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

LABOUR COURT

# **आदेश**

1. अर्ज (औघोगिक विवाद अधिनियम) क्र.08/2016 हा अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

2. उभय पक्षकारांनी नि. क्रं.युसी–1 सोबतच्या अटी व शर्तीचे पालन करण्या बाबत त्यांना निर्देशित करण्यात येते.

3. सदर आदेश कामगार उपायुक्त, मंबई यांना पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावा.

सही/–
(पी. एस. कुलकर्णी)
पिठासीन अधिकारी
7 वे कामगार न्यायालय, मुंबई.

दिनांकः 11/12/2019
ठिकाण : मुंबई.
स्नेसंवि/–

| | |
|---|---|
| Argued on | : 11/12/2019 |
| Order dictated on | : 11/12/2019 |
| Order Checked & Signed on | : 11/12/2019 |

LABOUR COURT